# जागृत देवी



## देवळांच्या गावा...

डॉ.तुषार यशवंत सावडावकर

श्री महालक्ष्मीची महाराष्ट्रात अनेक ठिकाणी मंदिरं आहेत. मुंबईतलं प्रसिद्ध महालक्ष्मी मंदिर अत्यंत रमणीय परिसरात आहे. या मंदिराचं वैशिष्ट्य म्हणजे दुर्गामातेची तीन रूपं इथे सुप्तावस्थेत आढळतात. उजवीकडे श्री महाकाली, मध्यभागी श्री महालक्ष्मी आणि डावीकडे श्री महासरस्वतीची मूर्ती आहे. अशा तऱ्हेच्या रचना दक्षिण भारतातल्या देवालयात आढळतात.

फार पूर्वी मुंबई सात बेटांचा समूह होता. इ.स.१७२० पर्यंत महालक्ष्मीचं मंदिर वरळी बेटावर होतं. या सुमारास दुष्ट प्रवृत्तींच्या वाढत्या आक्रमणांमुळे व मूर्ती उद्ध्वस्त करण्याची आणि फोडण्याची मानसिक वृत्ती लक्षात घेऊन भाविकांनी तिचं संरक्षण करण्याच्या उद्देशाने देवीच्या मूर्तीचं समुद्रात विसर्जन केलं, अशी एक आख्यायिका आहे.



याचदरम्यान मुंबई बेटाचं पोर्तुगीजांकडून इंग्रजांकडे हस्तांतरण झालं. मुंबईचं व्यापारी महत्त्व जाणून इंग्रजांनी ही सातही बेटं जोडण्यासाठी भराव टाकण्याचं व रस्ते बांधण्याचं काम सुरु केलं. इ.स.१७७५मध्ये लॉर्ड हॉर्नबी यांच्या राजवटीत समुद्रात भराव टाकून चौपाटी बेट वरळी बेटाला जोडण्याचा प्रकल्प सुरु झाला. या प्रकल्पाला जनतेचा विरोध होता तरीही ते काम चालू ठेवण्यात आलं. दिवसभरात जेवढं काम झालेलं असायचं ते समुद्राच्या भरतीच्या प्रचंड लाटांमुळे वाहून जायचं. दगडमातीचा भरावच्या भराव नाहीसा होत असे. या कामामध्ये ब्रिटिशांना प्रचंड नुकसान सोसावं लागलं. त्यामुळे ब्रिटिश सरकारने हे काम अर्धवट सोडून देण्याचा विचार केला होता.

या बांधकामाचं कंत्राट रामजी शिवाजी प्रभू या गृहस्थांना देण्यात आलं होतं. प्रभू यांच्या स्वप्नात श्रीमहालक्ष्मी देवीने असा दृष्टांत दिला की आम्हा तीन मूर्तींना बाहेर काढ आणि इथे आमची प्राणप्रतिष्ठापना कर म्हणजे तुमचं काम सुरळीत होईल. प्रभू यांनी ही गोष्ट तात्काळ लॉर्ड हॉर्नबी यांना सांगितली. शेवटचा उपाय म्हणून ब्रिटिश सरकारने समुद्रात जाळं टाकलं असता दृष्टांतानुसार देवीच्या तीन मूर्ती जाळ्यात आल्या. त्यानंतर ब्रिटिश सरकारने दिलेल्या जागेवर आजचं श्री महालक्ष्मी मंदिर उभं राहिलं.

सागरात सापडलेल्या तीन मूर्ती पाषाणाच्या असून त्या चतुर्भुज आहेत. वरळी कॉजवे या रस्त्याचं बांधकाम झाल्यावर प्रभू यांनी या मूर्तींची प्राणप्रतिष्ठापना केली व मंदिराची देखभाल करण्यास सुरुवात झाली. आश्चर्याची गोष्ट म्हणजे मूर्तीची प्राणप्रतिष्ठापना झाल्यानंतर सागराच्या भरतीने येणाऱ्या लाटांनी भराव वाहून जाण्याचा प्रकार थांबला.

श्रीमहालक्ष्मी मंदिर लहानशा टेकडीवर असून मंदिराला ३१ पायऱ्या आहेत. वास्तूशास्त्राच्या नियमानुसार मंदिर टेकडीच्या पश्चिम भागावर बांधलेलं आहे. श्रीमहाकाली, श्रीमहालक्ष्मी व श्रीमहासरस्वती या तीनही मूर्ती पूर्वाभिमुख आहेत. वास्तूशास्त्राच्या नियमानुसार हा अत्यंत उत्कृष्ट आविष्कार आहे. याचा अनुभव म्हणजे चैत्र नवरात्री व आश्विन नवरात्रीच्या आठ दिवस अगोदर सूर्याच्या किरणांनी देवीच्या पूर्णांगावर अभिषेक होतो. हा सोहळा पाहण्यासाठी भाविकांची अलोट गर्दी होते. या तीनही मूर्तींच्या समोर शंकराचार्य श्री जयेंद्र सरस्वती यांच्या शुभ हस्ते २००२ मध्ये ध्वजस्तंभाची स्थापना झाली. या ध्वजस्तंभावर वेगवेगळ्या देवतांचा निवास असतो अशी शंकराचार्यांची ठाम समजूत आहे. दरवर्षी १७ जून रोजी ध्वजस्तंभाच्या वर्धापन दिनानिमित्त देवीची भव्यदिव्य अशी पालखी शोभायात्रा काढण्यात येते. ही पालखी सायंकाळी चार वाजता निघून मंदिराच्या पायऱ्या उतरून धाकलेश्वर गल्लीतून बाहेर येऊन भुलाभाई देसाई रोडवर येऊन तिथून त्र्यंबकेश्वर महादेव मंदिर ते साधूबेला आश्रम, राणी सती मंदिर ते श्री महालक्ष्मी मंदिरामध्ये सात वाजेपर्यंत परत येते. हा पालखी सोहळा पाडव्यालादेखील केला जातो.

प्रत्येक मंदिराशेजारी एक तरी गोड्या पाण्याचं कुंड असतं. महालक्ष्मी मंदिरातही तीन गोड्या पाण्याची कुंडं होती. या कुंडांचं वैशिष्ट्य म्हणजे ही कुंडं भर समुद्रात असूनदेखील भरती ओसरल्यानंतर तिथे गोड पाणी मिळायचं. जेव्हा समुद्राला भरती येते तेव्हा खाऱ्या पाण्याने ही कुंडंदेखील भरली जातात. पण नंतर ओहोटी सुरू झाली की पुन्हा कुंडातून गोडं पाणी उत्पन्न होत असे. इथल्या भाविकांची अशी समजूत आहे की, श्रीमहाकाली, श्रीमहालक्ष्मी, श्रीमहासरस्वती मध्यरात्री या ठिकाणी येऊन स्नान करतात व शेजारी असणाऱ्या धाकलेश्वराच्या भेटीला निघून जातात.

दरवर्षी नवरात्री आणि विजयादशमी हे दोन सोहळे मोठ्या उत्साहात साजरे केले जातात. दर्शनासाठी व भोग अर्पण करण्यासाठी येणाऱ्या भाविकांची फार प्रचंड रांग लागलेली असते. मार्गशीर्ष महिन्यातलं वैभवलक्ष्मी व्रत अत्यंत प्रसिद्ध असून मार्गशीष महिन्यातल्या प्रत्येक गुरुवारी श्री महालक्ष्मीचं दर्शन घेतल्यास लक्ष्मी प्रसन्न होते अशी भाविकांची श्रद्धा आहे. या व्रताची सांगता श्री महालक्ष्मीच्या समोर करण्याची प्रथा आहे. लग्न झाल्यानंतर मुंबईतली बहुतेक जोडपी श्रीमहालक्ष्मीचं दर्शन घेण्यासाठी येतात व आपला भावी संसार सुखी होण्यासाठी देवीची खणा-नारळाने ओटी भरून करुणा भाकतात.

मंदिराच्या मागच्या बाजूला स्वयंभू श्री दर्या हनुमान मंदिर असून हनुमानाची मूर्ती पूर्वाभिमुख आहे. त्याच्याच समोर श्री दर्या गणेश मंदिर असून यातली श्री गणेशाची मूर्ती पश्चिमाभिमुख आहे. श्रीमहालक्ष्मीचं दर्शन घेतल्यावर या दोन मंदिरांचं दर्शन घेण्याची प्रथा आहे. श्रीमहालक्ष्मीच्या गाभाऱ्यामध्ये उजव्या बाजूच्या वरच्या ठिकाणी श्रीयंत्राची स्थापना केलेली आहे. याचं दर्शनदेखील भाविक घेतात.

सकाळी सहा वाजता श्रीमहालक्ष्मी मंदिराचं मुख्य प्रवेशद्वार दर्शनासाठी उघडलं जातं तर सकाळी सात वाजता महाआरती होते. दुपारी बारा वाजता देवीजवळ नैवेद्य ठेवला जातो. संध्याकाळी ठीक सहा वाजता धूपारती करण्यात येते. साडेसात वाजता देवीची पुन्हा महाआरती होते आणि रात्री दहा वाजता शेजारती होऊन श्री महालक्ष्मी मंदिराचं मुख्य प्रवेशद्वार बंद करण्यात येतं.

श्रीमहालक्ष्मी मंदिर ट्रस्टद्वारे रुग्णांसाठी साधारणतः अडीच कोटी रुपयांच्या आर्थिक मदतीचं नियोजन केलं जातं. यामध्ये प्रत्येक रुग्णाला हजार ते पाच हजार रुपयांची वैद्यकीय मदत मिळते. विद्यार्थ्यांच्या स्कॉलरशिपसाठी वार्षिक नव्वद लाखाची तरतूद केलेली असून त्याचा आठ हजार विद्यार्थी दरवर्षी लाभ घेतात. त्याचबरोबर मोफत वैद्यकीय चिकित्सा व औषधं यांचंही आयोजन केलं जातं.

(लेखक वास्तूतज्ज्ञ आहेत.)

mtartedit@gmail.com